# लोकशाही, लोकानुनय आणि उदारमतवादी मूल्यांचे संकट : एक चिकित्सक अभ्यास

**श्री. राजेश राम कांडगे, शिक्षण प्रसारक संस्था संगमनेर नगरपालिका आर्ट्स, डी जे मालपाणी कॉमर्स आणि बी एन सारडा सायन्स महाविद्यालय, संगमनेर, अहिल्यानगर, महाराष्ट्र, भारत** संपर्क क्र. – ९८२२११८७४०, ई-मेल :- rajeshramkandage@yahoo.co.in मु.पो.- चाकण, ता.- खेड, जि.- पुणे – ४१०५०१

---

**सारांश (Abstract) :-**

हा शोधनिबंध २१ व्या शतकातील जागतिक राजकारणापुढील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक असलेल्या 'लोकानुनय' (Populism) आणि त्यातून निर्माण झालेल्या 'उदारमतवादी लोकशाहीच्या' (Liberal Democracy) संकटाचे विश्लेषण करतो. गेल्या दशकात जगभरातील अनेक प्रस्थापित लोकशाही देशांमध्ये लोकानुनयी नेत्यांचा उदय झाला आहे, ज्यांनी प्रस्थापित संस्था, प्रसारमाध्यमे आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यांना प्रत्यक्ष आव्हान दिले आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश लोकानुनय ही संकल्पना मुळातून समजून घेणे आणि तिचा उदारमतवादी मूल्ये जसे की – वैयक्तिक स्वातंत्र्य, अल्पसंख्यांकांचे हक्क, न्यायसंस्थेची स्वायत्तता आणि सहिष्णुता, यांचेवर होणारा विघातक परिणाम तपासणे हा आहे.

संशोधनासाठी 'गुणात्मक, ऐतिहासिक आणि तुलनात्मक संशोधन पद्धतीचा' वापर करण्यात आला आहे. संशोधनातून असे दिसून येते की, आर्थिक विषमता, सांस्कृतिक असुरक्षितता, जागतिकीकरणाचे दुष्परिणाम आणि सोशल मीडियाचा अनियंत्रित प्रभाव यामुळे लोकानुनयाला खतपाणी मिळत आहे. लोकानुनय हा अनेकदा 'खरे लोक' विरुद्ध 'भ्रष्ट एलिट्स' अशी कृत्रिम विभागणी करतो, ज्यामुळे लोकशाहीतील बहुलतावाद धोक्यात येतो. संशोधनातून असे स्पष्ट होते की, जेव्हा लोकानुनय बळावतो, तेव्हा तो लोकशाहीच्या संस्थात्मक ढाच्याला आतून पोखरतो. निष्कर्षात असे सुचवले आहे की, लोकशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी केवळ नियतकालिक निवडणुका पुरेशा नसून, संस्थात्मक स्वायत्तता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या 'घटनात्मक नैतिकतेचे' (Constitutional Morality) जतन करणे अनिवार्य आहे. हा शोधनिबंध लोकशाहीच्या भविष्याबाबत एक गंभीर अशी तात्विक आणि व्यावहारिक चर्चा घडवून आणतो.

**मुख्य शब्द :** लोकशाही, लोकानुनय (Populism), उदारमतवाद, घटनात्मक नैतिकता, राजकीय ध्रुवीकरण, बहुसंख्यांकवाद, संस्थात्मक -हास.

## १.प्रस्तावना (Introduction) : –

१९९० च्या दशकात सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर जगविख्यात राजकीय विचारवंत फ्रान्सिस फुकुयामा यांनी 'इतिहासाचा अंत' (The End of History) घोषित केला होता (Fukuyama, 1992). त्यांच्या मते, पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही हा मानवी राजकीय उत्क्रांतीचा अंतिम आणि सर्वश्रेष्ठ टप्पा होता. साम्यवादाचा पराभव झाला होता. मात्र, तीन दशकानंतर आज चित्र पूर्णपणे वेगळे आणि चिंताजनक आहे. आज लोकशाहीचा जगभर प्रसार होण्याऐवजी ती अंतर्गत संकटात सापडली आहे. या संकटाचे मुख्य कारण म्हणजे 'लोकानुनय' किंवा 'पॉप्युलिझम'चा वाढता प्रभाव.

लोकशाही म्हणजे केवळ 'बहुमताचे राज्य' नाही, तर ती 'उदारमतवादी मूल्यांच्या' चौकटीत चालणारे राज्य आहे. उदारमतवादामध्ये कायद्याचे राज्य (Rule of Law), मानवी हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे रक्षण या गोष्टी अभिप्रेत असतात. मात्र, समकालीन राजकारणात 'लोकानुनय' हा 'लोकशाही'च्या नावाखाली याच उदारमतवाडी मूल्यांचा संकोच करताना दिसत आहे. लोकानुनयी नेते स्वत:ला जनतेचे एकमेव आणि अंतिम प्रतिनिधी मानतात. त्यांच्या मते, जनतेची इच्छा (General Will) ही कोणत्याही कायद्यापेक्षा किंवा संविधानापेक्षा श्रेष्ठ आहे. परिणामी, त्यांच्या मार्गात येणा-या न्यायसंस्था, स्वतंत्र प्रसारमाध्यमे किंवा संविधानिक मर्यादांना ते लोकशाहीविरोधी आणि 'जनतेच्या शत्रूंचे' हस्तक ठरवतात. लोकशाहीचा गाभा असलेला बहुलतावाद (Majoritarianism) प्रस्थापित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, लोकशाही आणि उदारमतवाद यांच्यातील हे तुटत चाललेले नाते, त्याचे आर्थिक-सामाजिक आधार आणि त्यातून निर्माण झालेले जागतिक संकट यांचा सविस्तर अभ्यास करणे अत्यंत निकडीचे आहे.

## २. साहित्य पुनरावलोकन (Literature Review) –

या विषयावरील सखोल आकलनासाठी जागतिक स्तरावरील खालील संदर्भ आणि सिद्धांत अत्यंत महत्वाचे ठरतात :

* **Jan-Werner Muller (2016) :** आपल्या 'What is Populism' या ग्रंथात मुलर यांनी स्पष्ट केले की, लोकानुनय हा मुळात बहुलतावादाचा विरोध (Anti-pluralism) आहे. लोकानुनयी नेते 'आम्ही आणि केवळ आम्हीच लोकांचे प्रतिनिधी आहोत' असा दावा करतात, ज्यामुळे विरोधातील सर्व मते अवैध ठरवली जातात.

* **Levitsky & Ziblatt (2018) :** 'How Democracies Die' मध्ये लेखकांनी इशारा दिला की, २१ व्या शतकात लोकशाही लष्करी बंडांनी (Coups) नव्हे, तर निवडून आलेल्या नेत्यांकडूनच हळूहळू संस्थांच्या खच्चीकरणाद्वारे संपवली जात आहे. हे 'सॉफ्ट ऑथॉटेरियनिझम'चे लक्षण आहे.

* **Yascha Mounk (2018) :** 'The People vs. Democracy' मध्ये मोंक यांनी 'उदारमतवाद नसलेली लोकशाही' (Illiberal Democracy) आणि 'लोकशाही नसलेला उदारमतवाद' (Undemocratic Liberalism) यांच्यातील वाढत्या संघर्षावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते, सामान्य जनतेला व्यवस्था आपल्या आवाक्याबाहेरची वाटू लागल्याने हा उद्रेक झाला आहे.

* **Farid Zakaria (1997) :** फरीद झकारिया यांनी 'Illiberal Democracy' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरून अशा देशांचा उल्लेख केला जिथे निवडणुका तर नियमित होतात, पण नागरी स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यांचा पूर्णत: अभाव असतो.

* **Pierre Rosanvallon (2008) :** यांनी 'Counter Democracy' मध्ये स्पष्ट केले की, लोकशाहीत संस्थांवरील अविश्वास वाढला की लोक थेट सत्तेकडे (Direct Power) आकर्षित होतात, जे लोकानुनयाला पोषक असते.

**३. संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives) :-**

* लोकानुनय (Populism) आणि उदारमतवादी लोकशाही यांच्यातील मूलभूत सैद्धांतिक आणि व्यावहारिक फरक स्पष्ट करणे.

* २१ व्या शतकातील लोकनुनयी राजकारणाच्या उदयाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मुळे शोधणे.

* उदारमतवादी मूल्यांच्या संकटाचे विविध पैलू, विशेषत: न्यायसंस्था, प्रसारमाध्यमे आणि नागरी हक्क यांवर होणारे परिणाम तपासणे.

* लोकशाही संस्थांचे स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आणि उदारमतवादी मूल्यांचे रक्षण करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना सुचवणे.

**४. संशोधनाची गृहितके (Hypotheses) :-**

* लोकानुनय हा जरी लोकशाहीचा एक प्रकार भासत असला, तरी तो बहुलतावादाचा शत्रू असल्याने दीर्घकाळात लोकशाहीच्या संरचनेलाच कमकुवत करतो.

* जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आर्थिक असुरक्षितता आणि वाढते सामाजिक ध्रुवीकरण हेच लोकानुनयी नेत्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य आधारस्तंभ आहेत.

* उदारमतवादी मूल्यांचा -हास हा अटळपणे लोकशाहीचे रुपांतर छुप्या हुकूमशाहीत करतो, ज्यामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण होते.

**५. संशोधन पद्धती (Research Methodology):-**

या शोध निबंधासाठी 'गुणात्मक,ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक' संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनासाठी विविध देशांमधील राजकीय घडामोडींचे निरीक्षण करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने अमेरिका (ट्रम्प युग), युरोप (हंगेरी, पोलंड), दक्षिण आशिया (भारत, श्रीलंका) आणि लॅटिन अमेरिकेतील (ब्राझील) राजकीय परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. माहिती संकलनासाठी 'V-Dem Institute' (University of Gothenburg) आणि 'Freedom House' यांच्या वार्षिक लोकशाही निर्देशांकाचा (Democracy Index) वापर करून लोकशाहीच्या जागतिक घसरणीचे विश्लेषण केले आहे. हा अभ्यास राजकीय तत्वज्ञान (Political Philosophy) आणि समकालीन राजकीय वास्तव (Contemporary Realities) यांच्या समन्वयावर आधारित आहे.

**६. लोकशाही आणि उदारमतवाद :-**

ब-याचदा सामान्य चर्चेत 'लोकशाही' आणि 'उदारमतवाद'हे शब्द समानार्थी म्हणून वापरले जातात, पण राजकीय सिद्धांतात त्यांच्यात मूलभूत आणि महत्वाचे फरक आहेत.

**६.१ लोकशाही (Democracy) –**

ही प्रामुख्याने एक राजकीय प्रक्रिया आहे. यामध्ये सत्तेचा स्रोत 'लोकांचे मत' किंवा 'बहुमत' असते. निवडणुका, मताधिकार आणि प्रतिनिधींची निवड ही लोकशाहीची मुख्य अंगे आहेत. जर ५१ टक्के लोक एखादा निर्णय घेत असतील, तर लोकशाहीनुसार तो वैध ठरतो.

**६.२ उदारमतवाद (Liberalism) -**

हे एक नैतिक आणि राजकीय तत्वज्ञान आहे जे व्यक्तीचे स्वातंत्र्य, नैसर्गिक हक्क, कायद्याचे राज्य आणि सत्तेच्या मर्यादेवर भर देते. उदारमतवादाचा मूळ विचार असा आहे की, अगदी १०० टक्के बहुमत असले तरी ते एखाद्या व्यक्तीचे मूलभूत स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाही.

जेव्हा या दोन गोष्टींचा संगम होतो, तेव्हा 'उदारमतवादी लोकशाही' (Liberal Democracy) अस्तित्वात येते. ही व्यवस्था केवळ बहुमताला महत्व देत नाही, तर अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठी संविधानाची कवचकुंडले उभी करते. मात्र, लोकानुनय हा यातील 'उदारमतवाद' काढून टाकण्याचा प्रयत्न करतो. तो केवळ 'बहुमताच्या सत्तेला' (Majoritarian Will) सर्वोच्च मानतो. ॲलेक्सिस डी टॉकविले यांनी १८३५ मध्येच इशारा दिला होता की, जर लोकशाहीवर उदारमतवादी मूल्यांचा अंकुश नसेल, तर तिचे रुपांतर 'बहुसंख्यांकांचा जुलूम' (Tyranny of the Majority) मध्ये होईल (Tocqueville, 1835/2003). आज आपण जागतिक स्तरावर नेमके हेच पाहत आहोत.

**७. लोकानुनय (Populism) : स्वरूप आणि उगम :–**

लोकानुनय ही केवळ निवडणुकीची रणनीती नसून ती एक खोलवर रुजलेली विचारधारा आहे. तिचे स्वरूप खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येते:

**७.१ 'खरे लोक' विरुद्ध 'भ्रष्ट उच्चभ्रू' –**

लोकानुनयी राजकारणाचे केंद्रस्थान म्हणजे समाजाचे दोन काल्पनिक आणि परस्परविरोधी गटांत विभाजन करणे. एकीकडे 'खरे लोक' (The Pure People) असतात- जे नेत्यांच्या मते प्रामाणिक, राष्ट्रप्रेमी आणि संस्कृतीरक्षक आहेत. दुसरीकडे 'भ्रष्ट उच्चभ्रू' (The Corrupt Elite) असतात- ज्यामध्ये प्रस्थापित राजकीय पक्ष, बुद्धिजीवी, मुख्य प्रवाहातील माध्यमे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचा समावेश होतो. लोकानुनयी नेता स्वत:ला या 'ख-या लोकांचा' एकमेव तारणहार म्हणून सादर करतो.

**७.२ लोकानुनयाच्या उदयाची कारणे –**

* **आर्थिक कारणे** – १९९० नंतरच्या जागतिकीकरणामुळे जगात संपत्ती तर वाढली, पण ती काही मोजक्या हातांत एकवटली. थॉमस पिकेटी (२०१४) यांनी त्यांच्या संशोधनात दाखवून दिल्याप्रमाणे, वाढती आर्थिक विषमता आणि मध्यमवर्गाची ढासळती आर्थिक स्थिती यामुळे लोकांचा प्रस्थापित व्यवस्थेवरचा विश्वास उडाला आहे. लोकानुनयी नेते या आर्थिक रागाला भांडवलदार किंवा स्थलांतरितांच्या विरोधात वळवतात.

* **सांकृतिक असुरक्षितता** – वेगाने होणारे सामाजिक बदल, स्थलांतर आणि आधुनिक जीवनशैलीमुळे पारंपारिक समुदायांना आपली अस्मिता (Identity) धोक्यात आल्याचे वाटते. याला 'कल्चरल बॅकलॅश' (Cultural Backlash) असे म्हणतात. नेते 'आपली संस्कृती धोक्यात आहे' असे सांगून भावनिक राजकारण करतात.

**८. उदारमतवादी मूल्यांचे संकट : प्रमुख पैलू :-**

लोकानुनयी लाटेमुळे उदारमतवादी मूल्यांच्या तीन मुख्य स्तंभांवर आघात होत आहेत:

**८.१ न्यायसंस्थेचे खच्चीकरण –**

उदारमतवादी लोकशाहीत न्यायसंस्था ही सत्तेच्या केन्द्रीकरणाला रोखण्याचे काम करते. मात्र, लोकानुनयी नेते न्यायसंस्थेला 'लोकांच्या इच्छेतील अडथळा' मानतात. हंगेरी आणि पोलंडसारख्या देशांत आपण पाहिले की, सरकारने न्यायाधीशांच्या नियुक्त्यांमध्ये हस्तक्षेप करून न्यायसंस्थेला सरकारचे बाहुले बनवण्याचा प्रयत्न केला. जेव्हा न्यायव्यवस्था स्वतंत्र राहत नाही, तेव्हा कायद्याचे राज्य संपते आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य सत्ताधा-यांच्या दयेवर अवलंबून राहते.

**८.२ प्रसारमाध्यमांवरील हल्ला –**

स्वतंत्र प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा 'चौथा स्तंभ' मानली जातात. उदारमतवादामध्ये प्रेसचे स्वातंत्र्य हे पवित्र मानले जाते. परंतु, लोकानुनयी नेते माध्यमांना 'फेक न्यूज' किंवा 'जनतेचे शत्रू' ठरवून त्यांची विश्वासार्हता मुद्दाम संपवतात. पत्रकारांवर

हल्ले करणे, सरकारी जाहिराती रोखणे किंवा केवळ अनुकूल माध्यमांना (Crony Media) राजाश्रय देणे, यातून मुक्त संवादाचा अवकाश आकुंचित होत आहे.

**८.३ अल्पसंख्यांकांचे हक्क –**

उदारमतवादाचे यश हे अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेत असते. मात्र, लोकानुनय हा मुळातूनच 'बहुसंख्यांकवादावर' (Majoritarianism) स्वार झालेला असतो. "आम्ही बहुसंख्य आहोत, म्हणून देश आमचा आहे", हा विचार रुजवला जातो. यामुळे धार्मिक, वांशिक किंवा भाषिक अल्पसंख्यांकांना दुय्यम नागरिक मानले जाऊ लागते, ज्यामुळे सामाजिक ऐक्याला तडा जातो.

**९. डिजिटल युग आणि लोकानुनयाचा प्रसार :-**

२१ व्या शतकातील तंत्रज्ञानाने, विशेषत: सोशल मीडियाने, लोकानुनयाला नवीन आणि विध्वंसक ताकद दिली आहे.

**९.१ थेट संवाद आणि 'फिल्टर बबल' –**

नेते आता वृत्तपत्रे किंवा टीव्ही चॅनेल यांसारख्या 'गेटकीपर्स'ना डावलून थेट जनतेशी ट्विटर, फेसबुक किंवा व्हॉट्सॲपद्वारे संवाद साधतात. यात तथ्यांची (Facts) शहानिशा होत नाही. सोशल मीडियाचे अल्गोरिदम लोकांना त्यांच्याच आयडीचा मजकूर वारंवार दाखवतात, ज्याला 'इको चेंबर्स' (Echo Chambers) म्हणतात. यामुळे लोकांचे विचार अधिक कट्टर बनतात.

**९.२ फेक न्यूज आणि ध्रुवीकरण –**

सत्यापेक्षा 'भावना' महत्वाच्या ठरतात. ज्याला 'पोस्ट-ट्रूथ' (Post-Truth) युग म्हटले जाते. खोट्या बातम्यांच्या आधारे समाजात भीती आणि द्वेष पसरवणे सोपे झाले आहे. तर्कशुद्ध आणि वैचारिक चर्चेची जागा आता ट्रोलिंग आणि शिवराळ भाषेने घेतली आहे. हे ध्रुवीकरण उदारमतवादी मूल्यांच्या संवादाला संपवून टाकते.

**१०. विश्लेषणात्मक चर्चा : लोकशाहीचा अंतर्गत -हास :-**

लेविट्स्की आणि झिब्लॅट (२०१८) यांच्या मते, आधुनिक काळात लोकशाही लष्करी बंडांनी मरत नाही, तर ती 'बॅलेट बॉक्स' (मतपेटी) मधूनच संपवली जाते. ही एक अत्यंत संथ आणि सूक्ष्म प्रक्रिया आहे :

* **नेत्यांची निवड** – प्रथम लोक लोकानुनयी नेत्याला लोकशाही मार्गाने निवडून देतात.
* **संस्थांचे ताब्यात घेणे** – सत्ता मिळाल्यानंतर हे नेते हळूहळू निवडणूक आयोग, तपास यंत्रणा आणि न्यायालयांमध्ये स्वत:ची माणसे नियुक्त करतात.
* **विरोधकांचे खच्चीकरण** – सरकारी यंत्रणांचा वापर करून विरोधकांना तुरुंगात टाकणे किंवा त्यांना राजकीयदृष्ट्या निकामी करणे.
* **संविधान बदलणे** – शेवटी संविधानात अशा सुधारणा केल्या जातात की, सत्ता कायमची एकाच गटाकडे राहील.

यालाच 'हायब्रीड रिजीम' (Hybrid Regime) म्हणतात. , जिथे बाहेरून लोकशाही दिसते, पण आतून ती हुकूमशाही असते. उदारमतवादी मूल्ये हा लोकशाहीचा आत्मा आहे; जर हा आत्माच नष्ट झाला, तर केवळ निवडणुकांचा सांगाडा उरतो.

**११. जागतिक उदाहरणे आणि तुलना :-**

* **अमेरिका** – डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात प्रस्थापित संस्थांवरील अविश्वास टोकाचा वाढला. २० जानेवारी २०२१ चा 'कॅपिटॉल हिल'वरील हल्ला हा लोकशाही संस्थांना थेट आव्हान देणारा लोकानुनयी प्रकार होता.
* **हंगेरी** – व्हिक्टर ऑर्बन यांनी उघडपणे 'Illiberal State' ची घोषणा केली. त्यांनी संविधानात बदल करून माध्यमांचे स्वातंत्र्य आणि न्यायसंस्थेचे अधिकार मर्यादित केले.
* **भारत** – जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतातही राजकीय ध्रुवीकरण, माध्यमांवरील दबाव आणि संस्थात्मक स्वायत्ततेबाबतच्या चिंता गेल्या दशकात वाढल्या आहेत.
* **लॅटिन अमेरिका** – ब्राझीलमधील जायर बोल्सोनारो यांच्या काळात पर्यावरणीय कायदे आणि लोकशाही मूल्यांना बाजूला सारून लोकप्रियतेचे राजकारण करण्यात आले.

**१२. संकट निवारण : लोकशाहीचे पुनरुज्जीवन कसे करावे :-**

हे केवळ राजकीय नसून ते नैतिक आणि सामाजिक आहे. त्यावर मात करण्यासाठी खालील उपाय सुचवले आहेत :

* **संस्थात्मक स्वायत्तता** – कोणत्याही परिस्थितीत निवडणूक आयोग, न्यायसंस्था आणि रिझर्व्ह बँक यांसारख्या संस्थांचे स्वातंत्र्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे. त्यांना राजकीय लाटांपासून वाचवण्यासाठी नवीन घटनात्मक सुरक्षा प्रदान करावी लागेल.

* **आर्थिक समावेशकता** – केवळ जीडीपी (GDP) वाढीवर लक्ष न देता, संपत्तीचे फेरवाटप आणि रोजगार निर्मितीवर भर दिला पाहिजे. लोकांची आर्थिक असुरक्षितता संपली, तर ते लोकानुनयी आवाहनांना बळी पडणार नाहीत.

* **नागरी शिक्षण आणि नैतिकता** – शिक्षण पद्धतीत 'क्रिटिकल थिंकिंग' (चिकित्सक विचार) आणि 'सहिष्णुता' या मूल्यांचा समावेश करावा. डॉ. आंबेडकरांच्या 'घटनात्मक नैतिकतेचा' धडा प्रत्येक नागरिकाला मिळणे आवश्यक आहे ( आंबेडकर, १९४९).

* **डिजिटल नियमन** – सोशल मीडिया कंपन्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर पसरणा-या द्वेषमूलक मजकुरासाठी जबाबदार धरले पाहिजे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ खोट्या बातम्या पसरवणे असा होऊ शकत नाही.

**१३. निष्कर्ष (Conclusion) :-**

* लोकशाही आणि उदारमतवाद या नाण्याच्या दोन बाजू आहेत. उदारमतवादाशिवाय लोकशाही ही बहुसंख्यांकांच्या जुलुमात रुपांतरित होते, तर लोकशाहीशिवाय उदारमतवाद हा उच्चभ्रूंची मक्तेदारी बनतो.

* लोकानुनय हा प्रस्थापित व्यवस्थेतील त्रुटींचा (जसे की भ्रष्टाचार, दुर्लक्ष) फायदा घेतो, पण तो जी उत्तरे देतो ती लोकशाहीच्या मूळ रचनेलाच नष्ट करणारी असतात.

* उदारमतवादी मूल्यांचे संकट हे मुळात मानवी प्रतिष्ठेचे आणि विश्वासाचे संकट आहे. जेव्हा नागरिक एकमेकांकडे 'शत्रू' म्हणून पाहू लागतात, तेव्हा लोकशाहीचा प्रभाव होतो.

* लोकशाही ही काही एकदा मिळवलेली स्थिर अवस्था नाही, तर ती रोजच्या संघर्षातून आणि जागरुकतेतून जपावी लागणारी प्रक्रिया आहे.

* भविष्यातील लोकशाही ही केवळ बहुमतावर आधारित नसून ती प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा आणि सत्याचा विचार करणारी असायला हवी.

**१४. शिफारशी (Recommendations) :-**

* **सत्ता विकेंद्रीकरण** – सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करून स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट करणे, जेणेकरून 'एकाच खंबीर नेत्यावरील' अवलंबले जाणे कमी होईल.

* **राजकीय पक्षांचे लोकशाहीकरण** – राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत निवडणुका अनिवार्य करणे, ज्यामुळे घराणेशाही किंवा एकाधिकारशाहीला आला बसेल.

* **बहुलतावादी संवादाला प्रोत्साहन** – विविध विचारधारांच्या लोकांनी एकत्र येऊन चर्चा करण्याचे मंच (Deliberative Forum) उपलब्ध करून देणे.

* **नागरी समाज (Civil Society)** – स्वयंसेवी संस्था आणि बुद्धिवंतांनी सक्रिय राहून सरकारवर नैतिक अंकुश ठेवला पाहिजे.

**१४. संदर्भ सूची ( References) :-**

* **Ambedkar, B. R. (1949)**, 'Speech in the Constituent Assembly on 25th November 1949', Government of India.

* **Applebaum, A. (2020)**, 'Twilight of Democracy : The Seductive Lure of Authoritarianism', Doubleday.

* **Fukuyama, F. (1992)**, 'The End of History and the Last Man', Free Press.

* **Levitsky, S., & Ziblatt, D. (2018)**, 'How Democracies Die', Crown.

* **Muller, J. W. (2016)**, 'What is Populism ?', University of Pennsylvania Press.

* **Mounk, Y. (2018)**, 'The People vs. Democracy : Why Our Freedom is in Danger and How to Save it', Harvard University Press.

* **Piketty, T. (2014)**, 'Capital in the 21st Century', Harvard University Press.

* **Rosanvallon, P. (2008)**, 'Counter Democracy : Politics in an Age of Destruct', Cambridge University Press.

* **Sandel, M. J. (2020)**, 'The Tyranny of Merit : What's Become of the Common Good ?' Farrar, Straus and Giroux.

* **Tocqueville, A. de. (2003)**, 'Democracy in America (G. Lawrence, Trans.)', Perennial Classics. (Original Work Published 1835).

* **V-Dem Institute. (2025)**, 'Democracy Report : Resilience and Fragility', University of Gothenburg.

* **Zakaria, F. (1997)**, 'The Rise of Illiberal Democracy', Foreign Affairs, 76(6), 22-43